मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरातील पास

## पालिकेच्या हद्दीबाहेरील कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण घेण्यासाठी पास : सवलतीच्या दरात पास योजनेस शेखर सिंह यांची मान्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय आज प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रशासक सिंह यांनी विविध विषयांना मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या व महापालिकेच्या हद्दीबाहेर शिक्षण घेणाऱ्या इयत्ता ५ वी टते १० वी च्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात पीएमपीएमएल बस चे पास उपलब्ध करून देण्यात येणारी योजना महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या पाससाठी आकारण्यात येणाऱ्या रक्कमेच्या ७५ % रक्कम महापालिका भरणार असून विद्यार्थ्यांना २५ % रक्कम पाससाठी भरावी लागणार आहे.

महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना महापालिकेच्या हद्दीबाहेरील कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण घेण्यासाठी सवलतीच्या दरात पास उपलब्ध करून देणारी योजना राबविण्यासाठीच्या विषयासह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी प्रशासकीय मान्यता दिली.

### पूरपरिस्थिती नंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा

» रहिवासी भागात असलेले गाळ धुवून काढण्यात आले आहे. शहरातील रस्त्यांवर साचलेले गाळ, केरकचरा काढण्यात आले असून पदपथ, स्मशानभूमी, विसर्जन घाट आदी ठिकाणी स्वच्छता करण्यात आली आहे. शहरातील विविध रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ४ असे एकूण ३२ रस्ते दुरुस्ती पथक नेमण्यात आले आहेत. तसेच शहरातील रस्ते दुरुस्तीची कार्य युद्धपातळीवर सुरु असल्याची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दिली असून आयुक्त सिंह स्वतः परिस्थितीचा आढावा घेत आहेत.

### विशेष बैठकीत मंजूर विषय

» १० वी १२ वी च्या मुलींना मोफत डिप्लोमा कोर्सेस उपलब्ध करून देणे, मौजे मोशी मधील पुणे नाशिक रस्ता टते वडमुखवाडी शिवेपर्यंतचा ९० मीटर रुंद रस्त्याने बाधित जमिनीचे भूसंपादन करणे, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इंडस्ट्रीयल स्पोर्ट्स असोसिएशन शुटींगबॉल स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना साहित्य पुरविणे, सर्व्हे नंबर २० आणि ९६ येथील शुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या पंपहाऊसचे दुरुस्तीविषयक कामे करणे, विविध भागात खोदण्यात आलेल्या चर बुजविणे, विविध भागातील रस्ते, नाले, प्रकल्प तसेच शहरातील विविध ठिकाणच्या देखभाल व दुरुस्तीच्या आदी विषयांना प्रशासक सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

---

# बांगलादेशींना पकडण्यासाठी पिंपरी-चिंचवड दहशतवाद विरोधी शाखा अलर्ट मोडवर

## बांगलादेशातील स्थित्यंतरानंतर पिंपरी-चिंचवड पोलीस अधिक सतर्क, औद्योगिक पट्ट्यात पुन्हा सर्च ऑपरेशन राबवण्यास सुरुवात झाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

बांगलादेशातील स्थित्यंतरानंतर पिंपरी-चिंचवड पोलीस अधिक सतर्क झाले असून, दहशतवाद विरोधी शाखा (एटीबी) अलर्ट मोडवर आली आली आहे. औद्योगिक पट्ट्यात पुन्हा सर्च ऑपरेशन राबवण्यास सुरुवात झाली असून, घुसखोर बांगलादेशी वास्तव्याला तर नाहीत ना याचा शोध घेतला जात आहे.

आत्तापर्यंत बनावट आधार कार्ड, पॅन कार्डच्या माध्यमातून पश्चिम बंगालमार्गे भारतात प्रवेश केलेल्या आणि त्यानंतर औद्योगिक पट्ट्यात नोकरीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमध्ये राहण्यास आलेल्या सुमारे ७० हून अधिक घुसखोर बांगलादेशींना दहशतवाद विरोधी ब्रांचने (एटीबी) पकडून मूळ देशी धाडले आहे.



चाकण, तळेगाव आणि पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यात तसेच शहरातील काही हॉटेल आणि अन्य काही ठिकाणी अकुशल कामगार म्हणून हे बांगलादेशी नोकरी करीत असल्याचे पोलिसांच्या आत्तापर्यंतच्या तपासातून उघड झाले आहे. बहुतांश बांगलादेशी नागरिकांनी पश्चिम बंगालमार्गे भारतात प्रवेश केल्यानंतर आधार कार्ड, पॅन कार्ड बनावट तयार केले होते. या बनावट कागदपत्रांच्या आधारे पासपोर्ट तयार केल्याचेही उघड झाले होते, तर काही लोकांनी बनावट आधार कार्ड, पॅन कार्डच्या माध्यमातून पासपोर्ट काढण्याकरिता अर्ज केल्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या विशेष शाखा आणि एटीबीमुळे हे प्रकार उघडकीस आले आहेत.

### कामगारांवरदेखील पोलिसांची नजर

» कंत्राटी कामगार नेमताना किंवां रोजंदारीवर कामगार नेमताना ते मूळचे कुठले आहेत आणि त्यांनी दाखवलेली कागदपत्र खरी आहेत का, याची पडताळणी कंपनी व्यवस्थापनाने करणे आवश्यक आहे. आत्तापर्यंत पकडण्यात आलेले बांगलादेशी हे मूळचे पश्चिम बंगालचे असल्याचे त्यांनी भासविले होते. त्यामुळे पश्चिम बंगालमधून शहरात आलेल्यांवर लक्ष ठेवतानाच ईशान्येकडील राज्यातून आलेल्या कामगारांवरदेखील पोलिसांची नजर असून ते खरेच भारतीय आहेत का हे पडताळून पाहिले जात आहे

### चिंचवड पोलिसांना यश

» गुन्हे शाखा, विशेष शाखा, आणि अन्य तीन पोलीस उपायुक्तांमार्फत गुन्हे प्रकटीकरण विभाग, तपास पथक आणि एटीबी यांच्या एकत्रित कार्यपद्धतीवर लक्ष ठेवले जात आहे. संशयित परप्रांतीय आणि परदेशी नागरिकांना पकडण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांना यश आले आहे.

# रस्त्यावर खड्डा झाला, व्हॉट्सअ‍ॅपद्वारे करा तक्रार, 24 तासांत दुरुस्ती

## पुणे महानगरपालिकेने अनोखी योजना, आता खड्ड्यांची तक्रार करण्यात येणार व्हॉट्सअ‍ॅपद्वारे करता येणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांना खड्डयांसंदर्भात 9043271003 या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर तक्रार करता येणार आहे. तसेच 020-25501083 या क्रमांकावर आपली तक्रार दाखल करता येणार आहे. पुण्यातील ३१७ जंक्शन वर तब्बल ५४४ खड्डे निर्माण झाले आहे.

पावसाळा आणि रस्त्यांवरील खड्डे हे एक नाते तयार झाले आहे. रस्त्याच्या दर्जाहीन कामांमुळे एक, दोन पावसात रस्ते खड्डेमय होतात. त्यासंदर्भात अनेक वेळा तक्रार करुन त्यांची दखल घेतली जात नाही. परंतु आता पुणे महानगरपालिकेने अनोखा योजना आणली आहे. पुणेकरांना आता खड्डयांची तक्रार करण्यात येणार व्हॉट्सअ‍ॅपद्वारे (WHATSAPP) करता येणार आहे. पुणे महानगरपालिकेकडून खड्डयांची तक्रार करण्यासाठी हेल्पलाइन नंबर दिला आहे. या क्रमांकावर तक्रार केल्यास 24 तासांत खड्डा बुजविला जाणार असल्याचा दावा पुणे मनपाने केला आहे.

शहरात विविध शासकीय संस्थांमार्फत व पुणे महापालिकेच्या विविध खात्यांमार्फत पायाभूत सुविधा नागरिकांना पुरविण्यासाठी खोदाईची कामे हाती घेण्यात येतात. या कामांमुळे तसेच गेले अनेक दिवसांपासून सतत पडत असलेल्या पावसामुळे पुणे शहरातील विविध डांबरी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. तसेच गेल्या दोन आठवड्यांपासून पावसाची दमदार हजेरी सुरूच होती. त्यामुळे रस्त्यांवर खड्डे बुजवण्याचे काम करणे अडचणीचे होत होते. शनिवारी रात्री पाऊस न पडल्याने पथ विभागाने पडलेले खड्डे बुजवण्याची मोठी मोहीम हाती घेतली होती.

मात्र, रविवारी (दि. ४) दिवसा मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने पथविभागाने खड्डे बुजवण्याचे काम थांबवले होते. रविवारी पाऊस थांबवल्यानंतर सोमवारी पुन्हा काम सुरू करण्यात आले. शहराला गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. पावसामुळे पथ विभागाच्या निष्कृष्ट दर्जाच्या कामाचे पितळ उघडे पडले आहे. रस्त्यांवर खड्डयांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यावर पुणेकरांकडून संताप व्यक्त केला जाऊ लागला आहे. त्यामुळे पुणे महापालिकेच्या पथ विभागाने मोठा गाजावाजा करत खड्डे बुडजविण्याची जणू स्पर्धाच सुरु केली होती. परंतु हॉटमिक्स प्लॉटवरील खडीमध्ये ओलावा असल्याने खड्डे बुजविण्यास मर्यादा येत असल्याचे कारण देत पथ विभागाने हे काम थांबवले होते. मध्येच ही स्पर्धा लांबवणीवर टाकण्याची नामुष्की महापालिकेच्या पथ विभागावर आली होती.




### या क्रमांकावर फोटोसह पाठवा तक्रार

» पुणे शहरातील नागरिकांना आता व्हॉट्सअ‍ॅपचा वापर करुन तक्रार दाखल करता येणार आहे. पुणे शहरात निर्माण झालेल्या रस्त्यावरील खड्डयांच्या फोटोंसह तक्रार करता येणार आहे. नागरिकांनी तक्रार केल्यानंतर 24 तासात महानगरपालिका करणार रस्त्यांची दुरुस्ती आहे. महापालिकेकडून शहरातील रस्त्या दुरुस्तीसाठी वेगवान हालचाली केल्या जात आहेत. पुणेकरांना 9043271003 या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर तक्रार करता येणार आहे. तसेच 020-25501083 या क्रमांकावर आपली तक्रार दाखल करता येणार आहे.

### मुरलीधर मोहोळ यांचे आदेश

» पुण्यात पावसाने उघडीप घेतली आहे. यामुळे शहरातील खड्डे बुजवण्याच्या कामास आणखी वेग देण्याचे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले आहे. पुणेकरांना खड्डयांपासून दिलासा देण्यासाठी महापालिकेत त्यांनी बैठक घेतली. त्या बैठकीत शहरात खड्डे बुजवण्याचे आणि पॅच वर्कच्या कामाला वेग देण्याचे आदेश दिले.

### ठळक निरीक्षणे

- » एकूण बुजविण्यात आलेले खड्डे -१२२४
- » पॅचवर्क करण्यात आलेले खड्डे – १५३
- » वापरण्यात आलेला काँक्रिट माल- ३६३ क्युबिक मीटर
- » वापरण्यात आलेला डांबरी माल- २५६ मेट्रिक टन

# नदीकाठ सुधार प्रकल्प रद्द करण्याची शिवसेनेची मागणी

## प्रकल्पामुळे पुराची आपत्ती ओढवली, असा आरोप करीत हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने केली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

नदीकाठ सुधार प्रकल्पामुळे पुराची आपत्ती पुणेकरांवर ओढवली, असा आरोप करीत हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने केली आहे. नदीकाठ सुधार प्रकल्पामुळे पुराची आपत्ती पुणेकरांवर ओढवली, असा आरोप करीत हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने केली आहे.

ही आपत्ती मानवनिर्मित आहे. भाजपने पुणेकरांवर लादलेला हा प्रकल्प आहे. भराव टाकल्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले. नदीप्रवाह काही ठिकाणी बंद केला गेला. त्यामुळे धरणातून सोडलेल्या फक्त ३५ हजार क्युसेक पाण्याचा फुगवटा तयार झाल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली. पूर्वी पावसात धरणातून ६५ हजार क्युसेक पाणी सोडल्यानंतरच पूरस्थिती निर्माण होत होती. सर्वसामान्य पुणेकरांच्या जिवाशी खेळणारा हा प्रकल्प राज्यातील सत्ताधारी, पुणे महापालिकेतील त्यावेळी प्रकल्पाला मान्यता देणारे सत्ताधारी लोकप्रतिनिधी, ठेकेदार, अधिकारी व एजंटाचे भले करणारा आहे. त्यामुळे हा जीवघेणा प्रकल्प रद्दच झाला पाहिजे, अशी मागणी ठाकरे गट शिवसेनेच्या पुणे शहर शाखेने महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

पुणे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, माजी नगरसेवक वसंत मोरे, विशाल धनवडे, संजय भोसले, योगेश मोकाटे, जानू आखाडे, उपशहरप्रमुख भरत कुंभारकर, मकरंद पेठकर, संतोष गोपाळ, प्रथमेश भुकन, अनिल परदेशी, राहुल जेटके यांनी यासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना निवेदन दिले.



### मुळामुठा नदीकाठ सुधारप्रकल्प सदोष

» ठाकरे गटाचे नेते आणि माजी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी संबंधित ठिकाणी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. नागरिक बेघर झाले आहेत. त्यांना पावसाळ्यापर्यंत निवारा मिळावा, अशी कळकळ नागरिकांनी व्यक्त केली. तसेच मुळामुठा नदीकाठ सुधारप्रकल्प कसा सदोष आहे. याचे सादरीकरणही पर्यावरण अभ्यासकांच्या मदतीने आदित्य ठाकरेंनी पुणेकरांना दिले.

### अन्यथा शिवसेनेकडून तीव्र आंदोलन

» संबंधित बाधितांना नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था केली का ? संबंधित भागांमध्ये परत पाणी घुसणार नाही, यासाठी कोणती उपाययोजना केली आहे? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अजूनही अनुत्तरित आहेत. त्यामुळे पुणे शहराचे प्रशासक म्हणून आयुक्त भोसले यांना खुलासा करावा. असे शिवसेनेने निवेदनात नमूद केले आहे. तसेच याबाबत खुलासा करून नदीकठ सुधारप्रकल्प रद्द करण्यात यावा. अन्यथा शिवसेनेकडून तीव्र आंदोलन केले जाईल, असाही इशारा देण्यात आला आहे.

# शहरातील खड्ड्यांचे प्रथमच फेसबुक सर्वेक्षण

## शहरातील रस्त्यांचा बट्ट्याबोळ : सर्वेक्षणात साडेतीनशेहून अधिक स्थानिक नागरिकांचा सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर 'स्मार्ट सिटी' म्हणून गणले जाते. मात्र, अलीकडच्या काळात शहरातील रस्त्यांच्या बट्ट्याबोळ झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या अपेक्षा असलेले लोकप्रतिनिधी शहरातील समस्यांबाबत बोलताना दिसत नसल्याने अखेर शहराचा जागृत नागरिक म्हणून काहींनी पुढाकार घेतला आहे. त्यापैकी शहराचे खड्डयांचे फेसबुक सर्वेक्षणाच्या माध्यमातून स्थिती सर्वसामान्यांसमोर मांडली आहे. यात जवळपास साडे तीनशेहून अधिक शहरवासीयांनी सहभाग घेतला.



रस्त्यावरती वाहन चालवताना खड्डे अन् वाहतूक कोंडी नित्याचीच झालेली आहे. दरम्यान, या वर्षीच्या पावसाळ्यात शहरामध्ये ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. एकही रस्ता असा नाही जिथे खड्डा नसावा. यामुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली आहे. रस्त्याच्या निकृष्ट दर्जामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे बोलले जात आहे. खड्डयांविषयी विशेषतः महापालिकेच्या वतीने कोणती कारवाई होत असल्याने हा प्रकार असाच सुरू आहे. मात्र याबाबत शहरातील काही जागृत नागरिकांनी याबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून चळवळ सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून पावसाळ्यात शहरातील पडलेल्या खड्डयांची सर्वेक्षण, तसेच शहरातील आजच्या स्थितीची माहिती देखील मागवण्यात आली होती. यामध्ये साडेतीनशे नागरिकांनी सहभाग दर्शवत त्या त्या ठिकाणची माहिती दिली. खड्डे, वाहतूक कोंडी आणि खोदकाम अशा काही समस्या नागरिकांनी थेट मांडल्या.

शहरातील नागरिकांनी व्यक्त होताना काही ठिकाणची परिस्थिती चांगली असल्याचे देखील नमूद केले आहे. मात्र, चाकण, चिखली, मोशी, देहूरोड या ठिकाणच्या भागात वाहतूक कोंडीसमवेत रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे सांगितले. तर, खड्डयांमुळे केवळ वाहनांचीच नाहीतर आरोग्याची देखील समस्या उद्भवते अन् पर्यायाने अपघाताचा धोका होत असल्याचे काहीजण व्यक्त झाले. प्राधिकरण, चिंचवड, आकुर्डी यासारख्या चांगले रस्ते असलेल्या ठिकाणी केवळ खोदकामामुळे रस्ते खराब झाले असल्याचे निदर्शनास आणून दिले. दरम्यान याबाबत माहिती देताना अमोल देशपांडे यांनी सांगितले की, शहरातील नागरिकांनी आपापल्या समस्या या मांडण्यासाठी एक व्यासपीठ तयार होणे अपेक्षित आहे. नागरी समस्या सोडवण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन तोडगा काढता येऊ शकतो. नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून हा प्रयत्न होता. नागरिकांनी महापालिकेकडे तक्रार करावी. त्याची निश्चितच दखल घेतली जाते. सारथी ॲपच्या माध्यमातून तक्रारींचे निरसन करण्याबाबत खुद्द आयुक्तांनी सूचना केलेल्या आहेत.

### पुण्यापेक्षा परिस्थिती बरी

» सोशल मीडियाच्या माध्यमातून शहरातील खड्डयांचे सर्वेक्षण करताना एक पोल घेण्यात आला. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहराची स्थिती पुण्यापेक्षा बरी असे म्हणणारे शहरवासीय मोठ्या प्रमाणात आहेत, तर पुण्यासारखीच काही फरक नाही असे म्हणणारे प्रमाण देखील तितकेच आहे. मात्र, पुण्यापेक्षा खूप चांगली असे म्हणणारे अगदी क्वचितच आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड १०० टक्के खड्डे मुक्त आणि समस्यामुक्त होण्यासाठी नागरिकांनी देखील स्वतःहून पुढाकार घ्यावा, असे आवाहन या माध्यमातून करण्यात आले आहे.

“ नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी आणि व्यक्त होण्यासाठी देखील हा छोटा प्रयत्न केला होता. मध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग व्यक्त केला. शहराची स्थिती चांगली असल्याचे देखील काही जण व्यक्त झाले आहेत. मात्र त्यातून समाधान व्यक्त न होता आणखीन चांगली कशी करता येईल यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

- अमोल देशपांडे, पिंपरी-चिंचवड फर्स्ट, ॲडमिन.

# अर्थसंकल्पासाठी 'ऑनलाइन' विकासकामे सूचवा

## सहभागी विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर उपयोगी असणारे प्रमाणपत्र देण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी महापालिका यंदापासून ऑनलाइन पद्धतीनेही अभिप्राय, सूचना मागविणार आहे. नागरिकांना रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने आणि क्रीडांगणे ही कामे सूचविता येणार आहेत. नागरिकांनी सूचविलेल्या कामांची शहानिशा करून संबंधित क्षेत्रीय अधिकारी विकासकामांचा समावेश अर्थसंकल्पात करणार आहेत.

अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग वाढावा, यासाठी महापालिकेच्या वतीने २००७-०८ या आर्थिक वर्षापासून नागरिकांनी सूचविलेल्या कामांचा अर्थसंकल्पात अंतर्भाव केला जात आहे. त्यानुसार, अर्थसंकल्प तयार करताना नागरिकांकडून सूचना मागविण्यात येतात. शहरातील विविध विकासकामे अधिक चांगल्या पद्धतीने व्हावीत, योजनांच्या अंमलबजावणीत नागरिकांचा सहभाग वाढावा आणि विकासकामांवर लक्ष असावे, अर्थसंकल्प लोकाभिमुख व्हावा, याहृष्टीने नागरिकांकडून अर्थसंकल्पासाठी सूचना मागविण्याचा उपक्रम महापालिकेकडून राबविला जात आहे. ऑफलाइन पद्धतीने अर्ज जमा करावे लागत होते. ही गैरसोय टाळण्यासाठी या वर्षापासून नागरिकांचे अभिप्राय स्मार्ट सारथी उपयोजन (ॲप) आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'क्युआर कोड'द्वारे ऑनलाइन



नागरिकांच्या सूचना संकलित केल्या जाणार आहे.

यामुळे सहज सूचना, अभिप्राय देणे शक्य होईल. रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने, क्रीडांगणे आणि इतर सार्वजनिक सुविधांमध्ये सुधार करण्यासाठी किंवा नव्याने मागणी करण्यासाठी नागरिकांना मदत होणार आहे. या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष समितीची नियुक्ती करण्यात येणार आहे. चालू आर्थिक वर्षातील नागरिकांच्या सूचनांचा पुढील आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात समावेश केला जाणार आहे.

### रस्ते, पाणीपुरवठा, पथदिव्यांबाबत सूचना

» महापालिकेचे संकेतस्थळ आणि स्मार्ट सारथी उपयोजनमधील 'क्यूआर कोड'द्वारे सूचना नोंदविता येतील. रस्ते, पाणीपुरवठा आणि पथदिव्यांबाबत सूचना करता येतील. क्षेत्रीय अधिकारी नागरिकांच्या सूचनांचे, माहितीचे मूल्यांकन करतील. निष्कर्ष आणि अंदाजपत्रकीय प्रस्ताव मान्यतेसाठी समितीसमोर सादर करतील.

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचे अभिप्राय २०२४-२५ मध्ये एकत्रित केले जातील. क्षेत्रीय कार्यालय मागील आर्थिक वर्षात जमा झालेल्या मालमत्ता कराच्या दहा टक्के भाग हा अर्थसंकल्पातील नागरी सहभाग उपक्रमाअंतर्गत आलेल्या निवडक सूचनांसाठी खर्च केला जाईल. नागरिकांच्या सूचना, प्रकल्प अंमलबजावणी आणि अंदाजपत्रकीय वाटपावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अंदाजपत्रक समितीकडे असणार आहे.

अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी ऑनलाइन कामे सूचविण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. नागरिकांनी सूचविलेल्या कामांचा अर्थसंकल्पात समावेश केला जाणार असल्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी सांगितले.

# पुण्यासाठी 21.48 टीएमसी पाणी कोट्याची मागणी

## शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सन 2024-25 या वर्षासाठी 21.48 अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी कोट्याची मागणी महापालिकेने केली आहे



**पुणे | प्रतिनिधी**

शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सन २०२४-२५ या वर्षासाठी २१.४८ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी कोट्याची मागणी महापालिकेने केली आहे. महापालिकेने पाण्याचे अंदाजपत्रक जलसंपदा विभागाकडे सादर केले असून, त्यामध्ये पाणीकोटा वाढविण्याची मागणी केल्याने जलसंपदा विभाग आणि पाणीपुरवठा विभाग आमने-सामने येण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या मागणीनुसार शहरासाठी वाढीव पाणीकोटा मंजूर होणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहराला खडकवासला धरण साखळी प्रकल्पातून पाणीपुरवठा केला जातो. गेल्या वर्षी शहरासाठी २०.९० टीएमसी पाणी मंजूर करावे, असा प्रस्ताव महापालिकेने दिला होता. मात्र शहरासाठी १२.८२ टीएमसी एवढा पाणीकोटा मंजूर करण्यात आला होता. खडकवासला धरणातून पाणी घेण्यासंदर्भात महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात करार झाला आहे. त्या करारानुसार महापालिकेला वार्षिक १२.४१ टीएमसी एवढे पाणी उपलब्ध करून दिले जाते. मात्र, शहराची वाढती लोकसंख्या, भौगोलिक विस्तार, स्थलांतरीत लोकसंख्या लक्षात घेऊन महापालिकेकडून गेल्या काही वर्षांत सातत्याने जास्त पाणीकोट्याची मागणी केली जात आहे.

राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आदेशानुसार महापालिकेकडून दरवर्षी पाण्याचे अंदाजपत्रक केले जाते. ते अंदाजपत्रक जलसंपदा विभागाला सादर केले जाते. त्यानुसार महापालिकेने अंदाजपत्रक सादर करताना २१.४८ टीएमसी पाण्याची मागणी केली आहे. महापालिका हद्दीत समाविष्ट झालेली ३४ गावे आणि शहराची ७७ लाख लोकसंख्या गृहीत धरून ही मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेने अंदाजपत्रकामध्ये लोकसंख्येच्या वाढीत सरासरी दोन टक्के वाढ गृहीत धरली आहे. पुढील वर्षभरात शहराची लोकसंख्या ७९ लाख ३९ हजार ९७४ एवढी होईल, असे नमूद केले आहे. शहरात होणारी ३५ टक्के पाणी गळती लक्षात घेऊन या वर्षी वाढीव पाणीकोट्याचा दावा केला आहे. समाविष्ट ३४ गावातील लोकसंख्या १८ लाख ११ हजार ३४० एवढी असल्याचेही नमूद करण्यात आले असून, समाविष्ट गावांसाठी २.१५ टीएमसी पाण्याची आवश्यकता असल्याचे महापालिका प्रशासनाकडून प्रस्तावात म्हटले आहे.

### वाढीव पाणीकोटा मंजूर होणार का?

» महापालिकेकडून होणारा पाण्याचा अपव्यय, गळती, चोरी आणि अधिकच्या वापरावरून जलसंपदा विभागाने सातत्याने महापालिकेला इशारा दिला आहे. पाणी वापर नियंत्रित करण्याची सूचनाही जलसंपदा विभागाकडून करण्यात आली आहे. या मुद्द्यावरून जलसंपदा आणि महापालिका अधिकाऱ्यांत आरोप-प्रत्यारोपही होत आहेत. आता महापालिकेने २१.४८ टीएमसी पाणीकोट्याची मागणी केल्याने या दोन्ही विभागात पुन्हा वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेच्या मागणीनुसार वाढीव पाणीकोटा मंजूर होणार का, हा प्रश्नही कायम राहिला आहे.

" महापालिकेने जलसंपदा विभागाला वार्षिक २१.४८ टीएमसी पाणीकोट्याचा प्रस्ताव दिला आहे. त्याबाबत लवकरच निर्णय होईल. लोकसंख्या वाढीनुसार पाणी मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

**- नंदकिशोर जगताप, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**

# राज्यात मतदार केंद्रांच्या संख्येत पुणे अव्वलस्थानी

## विधानसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यात राज्यात सर्वाधिक मतदान केंद्रे : उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर



**पुणे | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पुणे जिल्ह्याची प्रारूप मतदारयादी मंगळवारी (६ ऑगस्ट) प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत तब्बल २०४ मतदान केंद्रांची नव्याने भर पडली असल्याने जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांसाठी एकूण ८४१७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. ही संख्या राज्यात सर्वाधिक असल्याने मतदान केंद्रांमध्ये पुणे हे अव्वलस्थानी पोहोचले आहे. पुण्याखालोखाल मुंबई उपनगर, ठाणे आणि नागपूर जिल्ह्यात मतदान केंद्रे आहेत.

पुणे जिल्ह्यात २१ विधानसभा मतदारसंघ आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी या मतदार संघांची प्रारूप मतदारयादी जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी मंगळवारी प्रसिद्ध केली. या प्रारूप मतदार यादीत जिल्ह्यात ८४१७ मतदान केंद्रांवर एकूण ८४ लाख ३९ हजार ७२९ मतदार असून त्यापैकी ४४ लाख तीन हजार ३४४ पुरुष, ४० लाख ३५ हजार ६४० महिला आणि ७४५ तृतीयपंथीय मतदार आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यातील पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान केंद्रांची संख्या ही ८२१३ होती. विधानसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यात राज्यात सर्वाधिक मतदान केंद्रे असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीसाठी मुंबई उपनगर, ठाणे, नागपूर या जिल्ह्यांतील मतदान केंद्रांची संख्या वाढली, तरी पुणे जिल्ह्यापेक्षा जास्त मतदान केंद्रे होण्याची शक्यता फारच कमी आहे. परिणामी पुणे जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत राज्यात सर्वाधिक मतदान केंद्रे असतील, असेही कळसकर यांनी सांगितले.

### प्रमुख जिल्ह्यांमधील मतदान केंद्रे

| | |
|---|---|
| » मुंबई उपनगर – | ७३८० |
| » ठाणे – | ६५९२ |
| » नाशिक – | ४८०० |
| » नागपूर – | ४५१० |
| » नगर – | ३७३४ |
| » सोलापूर – | ३६१७ |
| » जळगाव – | ३५८२ |
| » कोल्हापूर – | ३३६८ |
| » छत्रपती संभाजीनगर – | ३०८५ |
| » नांदेड – | ३०४७ |
| » सातारा – | ३०२५ |
| » सिंधुदुर्ग – | ९१८ |
| » गडचिरोली – | ९५० |